ATOMIC ENERGY CENTRAL SCHOOL NO. 2, MUMBAI

PERIODIC TEST–3 (2023 – 24) Date:

M.M: 40 Class X Marathi Time: 90Min

Marathi- Aksharbharti(L-9,10,15,16,RR-2)

---

प्रश्न क्र.1) पुढील अपठीत उतारा वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर (१४एप्रिल,१८९१ ते ६डिसेंबर, १९५६), हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' किंवा 'आधुनिक भारताचे निर्माते' असेही म्हणतात.

बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थांमधून अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदव्या मिळविल्या; तसेच त्यांनी कायदा, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांवर संशोधन केले. त्यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत, ते एक अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि वकील होते. त्यानंतर त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रांत काम केले. ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रचारामध्ये व चर्चांमध्ये सामील झाले, वृत्तपत्रे प्रकाशित केली, दलितांसाठी राजकीय हक्कांचा व सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, तसेच आधुनिक भारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले.

इ.स. १९५६ मध्ये त्यांनी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. धर्मांतरानंतर काही महिन्यांनीच त्यांचे निधन झाले. इ.स. १९९० मध्ये, त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात केला. त्यांचा जन्मदिवस दरवर्षी आंबेडकर जयंती म्हणून भारतासह जगभरात साजरा केला जातो.

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कोणत्या चळवळीला प्रेरणा दिली?
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर किती वर्ष जगले?
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कोणच्या हक्कांचे समर्थन केले?
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश भारतात कोणते मंत्रीपद भुषविले होते?
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कोणत्या विषयांवर संशोधन केले.

प्रश्न क्र.2) पुढील प्रश्नांचा योग्य पर्याय निवडा(कोणतेही अकरा) 11

1. निरंजनला सरकारी वसतिगृहात प्रवेश द्यायचे कोणी ठरविले होते? (तालुकाअधिकारी /जिल्हाधिकारी /मुख्याध्यापक)
2. या देशाच्या मातीवरती कोणाचा आधिकार आहे? (भारतियांचा /परदेशाचा /ब्रिटीशांचा /विश्वाचा)
3. या ........ विभव संपदा जपू वाढवू आम्ही लाखदा (जगाची /विश्वाची /देशाची /मातीची)
4. सैनिकाचे औक्षण केले जाते (तबकातील निरांजनाने /भाकरीच्या तुकड्याने /डोळ्यातील आसवांच्या ज्योतींनी /भरलेल्या डोळ्यांनी)
5. ज्ञानपीठ, विशाखा, नटसम्राट हे संदर्भ कोणाविषयी आहेत? (शंकर पाटील /द मा मिरासदार /बालकवी /कुसुमाग्रज)
6. 'रंग साहित्याचे' या पाठात आलेले कथाकार- (य गो जोशी, शंकर पाटील, द मा मिरासदार, व पु काळे /गंगाधर गाडगीळ, पु ल देशपांडे, रमेश मंत्री, रा भि जोशी /माधवी देसाई, धनंजय गाडगीळ, मीना प्रभू, कुसुमाग्रज)
7. स्वतःच्या जीवनप्रवासाचे तटस्थपणे केलेले वर्णन म्हणजे- (कादंबरी / कविता /चरित्र /आत्मचरित्र)
8. कवितेला गाण्यात रूपांतर करणाऱ्याला........ म्हणतात (संगीतकार /नेपथ्यकार /कवी /दिग्दर्शक)
9. 'खरा नागरिक' या पाठात निरंजनच्या हुशारीमुळे काय घडले? (रेल्वेचा अपघात टळला /नागरिकशास्त्राचा त्याचा पेपर चांगला गेला /स्टेशन मास्तरला त्रास झाला /निरंजनची परीक्षा बुडाली
10. पुढील कोणते वाक्य सत्य आहे? (प्रवासी घटनेचा पंचनामा करू लागले /निरंजनला सरकारी वसतिगृहात प्रवेश मिळाला /रेल्वे रुळाखाली पडलेले भगदाड पाहून निरंजन सरळ परीक्षेला निघून गेला)
11. भडसावळे गुरुजींच्या मते सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, याचे कोणते कारण असत्य आहे? (शरीराला पुरेशी विश्रांती मिळाल्यामुळे ते ताजेतवाने बनलेले असते /दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचे आवडते भक्ती गीत ऐकू येते /हवेत सुखद गारवा असतो /पक्ष्यांच्या चिवचिवाटामुळे अडथळे येतात)
12. औक्षण कवितेतील दीनदुबळे कोणाला म्हटले आहे?

(कष्टाचे पैसे नसलेले /सैनिकांबरोबर न लढणारे /शारीरिकदृष्ट्या सक्षम नसलेले /सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय)

13. खूप पात्रे असणारी, प्रसंगातून कथानक उलगडणारी, अनपेक्षित वळण घेणारे साहित्य- (कथा /कादंबरी /कविता /नाटक)

14. निरंजनची स्तुती फोटोसकट कुठे प्रसिद्ध झाली होती? (वर्तमानपत्रात /दूरदर्शनवर /रेल्वेस्टेशनात)

15. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर देऊ शकला नाही कारण(आई-वडिलांचे निधन /आजारी होता /घातपाताची माहिती द्यायला रेल्वेस्थानकात गेल्यामुळे)

प्रश्न क्र.3) पुढील वाक्ये सूचनेप्रमाणे बदलून लिहा.(कोणतेही अकरा) 11

1) आज माझे काम मुलांनी अचूक केले, असे संजय म्हणाला. (या वाक्यातील सामान्यनाम ओळखून त्याचा विरूद्धलिंगी शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा)
2) सततच्या सरावाने त्याने बुद्धिबळ स्पर्धा जिंकली. (या वाक्यातील क्रियाविशेषण ओळखून त्याजागी दुसरे क्रियाविशेषण वापरून वाक्य पुन्हा लिहा)
3) मैदानात पावसाने चिखल झाला.
   (वाक्याचा काळ ओळखून त्याचे भविष्यकालीन रूप तयार करा)
4) खालीलपैकी विधानार्थी वाक्य कोणते? नेहमी खरे बोलावे /देवा, मला आशीर्वाद दे ! /अंधारात कोण चालेल? /झाडावर पक्षी बसले आहेत.
5) खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती? (माता - पिता /अंकिला - अंकित /काज - संकट /खेचर गगनचर)
6) पूर्वी रमेश व मी झाडावरचे आंबे काढत असू. (वाक्यात कोणती शब्दांची जात नाही.) (क्रियाविशेषण अव्यय ब) सर्वनाम क) केवलप्रयोगी अव्यय ड) शब्दयोगी अव्यय
7) ‘तो मॅरथॉन धावला’ या वाक्याच्या वर्तमानकालीन नसलेल्या वाक्याचा पर्याय शोधा. (तो मॅरॅथॉन धावतो /तो मॅरॅथॉन धावत आहे /तो मॅरॅथॉन धावेल /तो मॅरॅथॉन धावलेला आहे)
8) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती? (उत्साह x आळसी /उपद्रवी x निरुपद्रवी /कीर्ती x प्रसिद्ध /दिवस x रात्री)
9) खालीलपैकी भिन्न लिंगी शब्दाचा पर्याय ओळखा. (बोका /लांडोर /म्हैस /पाहुणा)

10)खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता? (नवरात्र /पंचवटी /गैरहजर /सप्तमी)

11)तो नियमित शाळेत जात नाही. (होकारार्थी वाक्यात रूपांतर करा) (तो अनियमितपणे शाळेत जाईल /तो नियमित शाळेत जाईल. /तो कधीकधी शाळेत जातो)

12)वा! किती सुंदर आहे तुझा शर्ट!

(वाक्याचा प्रकार ओळखून त्याचे विधानार्थी वाक्यात रूपांतर करा)

13)समासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा. कृष्णार्जुन, गैरहजर

14)खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता? अ) दरी ब) पर्वत क) समुद्र ड) डोंगर

15)पुढील वाक्यप्रचाराचा वाक्यात उपयोग करा- हात उचलणे

प्रश्न क्र.4) खालील प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा. (कोणताही एक) 3

1. 'निरंजन खरा नागरिक' हे तुमच्या शब्दात स्पष्ट करा
2. निरंजनची दिनचर्या लिहा.
3. चरित्र या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्य सांगून तुम्ही वाचलेल्या एखाद्या चरित्राचे नाव लिहा
4. कथेचे प्रकार सांगून या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.

प्रश्न क्र.5) खालील काव्य ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.(कोणतीही एक) 3

1) या हातांनी यंत्र डोलते। श्रमशक्तीचे मंत्र बोलते। उद्योगाचे चक्र चालते।
आभाळावर उत्क्रांतीचा। घूमवू या ललकार।।

2) हजार आम्ही एकी बळकट। सर्वांचे हो एकच मनगट। शक्तीची ही झडते नौबत।
घराघरातून जन्म घेतसे।तेज नवा अवतार।।

प्रश्न क्र.6) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही दोन) 2

1) 'इनामदार' या शब्दाचा अर्थ व्युत्पत्तीकोशाच्या आधारे लिहा.
2) 'अत्तर' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला?
3) 'आग' या शब्दाची कोणती व्युत्पत्ती सांगितली आहे?
4) 'दार' प्रत्यय असलेले कोणतेही दोन शब्द लिहा.

प्रश्न क्र.7) खालील कोणताही एक लेखन प्रकार सोडवा 6

1) निबंध- मी चंद्रावर रहायला गेलो तर....

2) सतिश /सरिता , परमाणू ऊर्जा केंद्रीय विद्यालय अणुशक्तीनगर मुंबई, शालेय ग्रंथालय प्रतिनिधी या नात्याने, व्यवस्थापक, परमजित पुस्तकालय - रानडे रोड, पुणे, यांना शाळेसाठी मागवलेली पुस्तके दोषयुक्त आहेत याबाबतचे तक्रार पत्र लिहा.

3) कथा:- दोन मित्र - समुद्रातून होडीने प्रवास - वादळवारे - होडीचे तुकडे - एका परीचा आधार - फळी एकावेळी एकालाच आधार देऊ शकत होती - माझ्या आईला सांभाळ - पहिल्या मित्राची विनवणी - दुसरा कोळी सोडतो- पहिला मित्र वाचतो - तात्पर्य

xxxxxxxx